क्र.मनपा/नसवि/२/ ०५ /२०१३-२०१४
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.
दिनांक :- १० / १० /२०१३.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०५ /२०१३-२०१४

महानगरपालिका सर्वसाधारण सभेची नोटीस

मा. _____

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांना

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महानगरपालिका सभेचे कामकाज" मधील खंड १ (ह) व (आय) मध्ये केलेल्या तरतूदीनुसार सांगली,मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दि.१९/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह,सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठांतील विषय विचाराधीन आहेत. तरी, सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यपत्रिका

१. मागील म्हणजे दि.२०/०७/२०१३ ची तहकूब दि.२४/०७/२०१३ रोजीच्या आणि दि.२०/०९/२०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २९-अ मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी प्रभाग समित्यांचे गठण करणे.

५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१-अ मधील तरतुदीनुसार व महानगरपालिकेच्या विशेष समिती मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीचे गठण करणे.

६. महापालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे,झाडांच्या धोकादायक फांद्या, वठलेली झाडे इत्यादी जळावू लाकडांचा तसेच, लाकडांचा तोडणी खर्च व वाहतूक खर्च वजा जाता प्रतिटन रु.१,०००/- किमान देकार रक्कम गृहीत धरुन, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी विषयपत्रातील शर्ती-अटी अवलोकनी घेवून जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (सार्व.उद्याने विभाग) यांचे दि.०२/०९/२०१३ चे विषयपत्र.**

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पूरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५/२०१३-१४

महापालिका सभा दिनांक १९/१०/२०१३ करीता.

शनिवार दि.१९/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २"महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.श्री.किशोर दादासो जामदार, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रात सार्वजनिक मंडळे व संस्था यांच्या वतीने लोक वर्गणीतून गणपती उत्सव,नवरात्र उत्सव मोहरम इत्यादी उत्सव सार्वजनिक स्वरुपात साजरे केले जातात. या उत्सवांच्या माध्यमातून संस्कृती जोपासणे, लोक जागृती, पर्यावरण जागृती व शासनाचे धोरणाबाबत माहिती दिली जाते व अनेक समाजोपयोगी कार्य करीत असतात असे कार्यक्रम महापालिकेच्या रस्त्यांवर स्टेज व मंडप घालून साजरे केले जातात. यासाठी महापालिकेकडून रस्त्यावर स्टेज मंडप घालण्यासाठी शुल्क आकारले जाते हे उपक्रम सार्वजनिक असल्याने व ते लोकवर्गणीतून होत असल्याने यासाठी शुल्क आकारणे अन्यायकारक वाटते अशा कार्यक्रमांसाठी सार्वजनिक मंडळे व संस्था यांना महापालिकेच्या क्षेत्रात स्टेज व मंडप घालण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्ण माफ करण्यास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.श्री.सैनुद्दीन शमशुद्दीन बागवान, यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज शहरातील लोणी बाजारामधील आजपर्यंत किती व्यावसायिकांचे हातगाडे जप्त केले. किती हातगाडेवाल्यांवर दंडात्मक कारवाई केली. अद्यापही तिथे हातगाडे लावून व्यवसाय करीत आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केली आहे. मा.शासनाचे फेरीवाले धोरण अंतर्गत प्रशासनाने आजअखेर तेथील व्यवसायिकांचे नियोजन केले नाही. सद्या तेथील व्यवसायिकांची उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचा उदरनिर्वाह त्यांच्या व्यवसायावरच अवलंबून आहे. बरेच दिवस झाले त्यांना पर्यायी व्यवस्था प्रशासनाने केलेली नाही. प्रशासनाने कोणते धोरण अवलंबिले आहे? याबाबत चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.सौ.अनारकली जमीर कुरणे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील (१) आमराई उद्यानामध्ये येणाऱ्या नागरिकांच्या लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची खेळणी बसविणेत आलेली होती. परंतु सद्यस्थितीस सदर खेळण्यांची फार दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या लहान मुलांची गैरसोय होत आहे. तसेच उद्यानाचे सौंदर्य लोप पावत आहे. याकरीता सदरची खेळण्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. (२) पद्मभूषण डॉ.वसंतदादा मार्केट यार्ड येथील विष्णूआण्णा सार्वजनिक उद्यान येथील लोखंडी गेट व खेळण्यांची मोडतोड झालेली आहे. त्यांचीही दुरुस्ती करणे गरजेचे आहे व सदर उद्यानामध्ये नवीन झाडांची लागवडही करणेत यावी. तसेच सदर उद्यानामध्ये पुन्हा मोडतोडीचे प्रकार घडू नयेत याकरिता उद्यानामध्ये एक सुरक्षारक्षक कम वॉचमन नेमण्यासाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.श्री.सुरेश देवाप्पा आवटी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांना पाणी कनेक्शन देण्यासाठी यापूर्वी महासभेने गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याच्या अटीवर रु.१०० मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देण्याचे धोरण अवलंबले होते. परंतू गुंठेवारी नियमितीकरणाची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपल्याने गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देणे प्रशासनाने बंद केले होते.

गुंठेवारी भागातील नागरिकांचे कडून सदरची योजना पुर्ववत सुरु करणेची वारंवार मागणी होत आहे. तसेच, दि.१९/०५/२०१२ रोजीच्या महासभेमध्ये गुंठेवारी नियमितीकरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे गुंठेवारी भागातील नागरिकांना रु.१०० मात्रचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन पाणी कनेक्शन देणेची योजना पूर्ववत सुरु करण्यास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

... २ ...

५. मा.श्री.जगन्नाथ बापू ठोकळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

गोकूळनगर ते मार्केट यार्ड कडे जाणाऱ्या रस्त्यावर कोंची कोरवी समाजाच्या स्मशान भूमी समोरील महानगरपालिकेच्या मालकीच्या त्रिकोणी जागेवर साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व रयतचे राजे राजर्षी शाहू महाराज यांचे अर्धपुतळे बसविणेत यावेत व सदर परिसराला भिमांगण परिसर नाव देणेत यावे. शिवाय बगीचा तयार करणेत यावा. तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.श्री.संजय नायकु मेंढे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या गुंठेवारी भागातील नागरिकांना आपली गुंठेवारी नियमितीकरणासाठी मुदत वाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढी प्रस्तावावर मा.आयुक्तसो यांनी स्वाक्षरी करणेसाठी गुंठेवारी नियमितीकरणासाठी खरेदीपत्र आवश्यक असलेचा शेरा लिहून मुदतवाढ ठरावावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक गुंठेवारी भागातील नागरिकांची गैरसोय झाली आहे. या अटीमुळे अनेक नागरिकांनी आपले प्रस्ताव सादर केले नाहीत. तरी, सदर अट मा.महाराष्ट्र शासन यांचे आदेशान्वये रद्द करुन गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल करणेसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

७. मा.श्री.सुरेश देवाप्पा आवटी, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दिवाणी न्यायालय जिल्हा न्यायालय,कामगार न्यायालय तसेच औद्योगिक न्यायालय व मुंबई हायकोर्ट तसेच, सुप्रिम कोर्टात विविध दावे चालू आहेत. याकामी यापूर्वी कोर्टामध्ये दावे चालविणेकरीता पॅनेल वरील वकीलांची नियुक्ती केली आहे. याबाबत नियुक्ती केलेले वकील यांचेबाबत तसेच पॅनेलवर नविन वकील नियुक्त करणेस मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

८. मा.श्री.पै.गौतम संभाजी पवार, यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या खालील विषयांवर चर्चा होवून धोरणात्मक निर्णयासाठी आलेला प्रस्ताव.

१. महानगरपालिकेच्या सद्याच्या आर्थिक स्थितीबाबत चर्चा करणे.
२. महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने नवनवीन उत्पन्नाचे स्त्रोतांबाबत चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे.
३. महापालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुर्नवसनाचे रखडलेल्या कामाबाबत चर्चा करुन सदरची पुर्नवसन योजना लवकरात कशी पूर्ण होईल याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १५/१०/२०१३.

महापालिका सुचिव
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८३

विषय क्रमांक :- ०१

मागील म्हणजे महासभा दिनांक २०/०७/२०१३ ची तहकूब दि.२४/०७/२०१३ रोजीच्या महासभा कार्यवृत्तातील ठराव क्र.१५१ ते ठराव क्र.१७१ हे सभागृहामध्ये वाचणेत आले. कार्यवृत्त कायम करणेबाबत उपस्थित सदस्यांनी तहकूब सभेत ऐनवेळचे विषय घेता येत नसलेने त्याबाबत हरकत नोंदवून ठराव क्र.१६३ ते १७० हे ठराव कार्यवृत्तातून वगळणेत यावे अशी मागणी केली. त्यानुसार दि.२०/०७/२०१३ ची तहकूब दि.२४/०७/२०१३ रोजीच्या महासभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१५१ ते ठराव क्र.१६२ व ठराव क्र.१७१ हे कायम करणेत येत असून, ऐनवेळचे ठराव क्र.१६३ ते १७० हे सर्वानुमते कार्यवृत्तातून वगळणेत येत आहेत. तसेच, सदरचे ऐनवेळचे ठराव प्रकरणी दोषी असणारे संबंधीतावर योग्यती कारवाई करणेत यावी असे ही सभा सूचित करीत असून, त्याची नोंद घेवून प्रशासनाने योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी.

महासभा दि.२०/०९/२०१३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१७२ ते ठराव क्र. १८२ ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

शहर अभियंता ठराव क्र. १६६,१६९,१७०
नगर अभियंता (मा.व.द.सु.) ठ.क्र.१६३ ते १६४,१६७,१६८,
कार्यशाखा ठ.क्र.१७०
कार्यकारी अभियंता ठ.क्र.१७०
वैद्यकीय आरोग्याधिकारी ठ.क्र.१७०

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, माजी केंद्रीय मंत्री व वनराईचे संस्थापक कै.डॉ.मोहन धारिया यांचे पुणे येथे वृद्धापकाळाने वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

सौ.कांचन कदम
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी सदस्य व तत्कालीन मिरज नगरपरिषदेचे नियोजन समितीचे सभापती कै.अशोक खटावकर (महाराज) यांचे दि.०७ आक्टोंबर २०१३ रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासाो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ. कांचन उ. कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- ९८६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कर्मचारी कै.शफीकमहंमद नुरमहंमद शेख यांचे दि.०७ आक्टोंबर २०१३ रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवठा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिरज शहरातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते जैनुद्दीन ऊर्फ आबा सौदागर यांचे दि.०५/१०/२०१३ रोजी दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने मिरजेतील एक सामान्य समाजासाठी झटणारा कार्यकर्ता हरपला आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.मैनुद्दीन बागवान

अनुमोदक :- मा.प्रार्थना मदभावीकर

ठराव सर्वानुमते मंजुर

२५ कांचन कुंभार्पण

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवटा ठराव

कै.रमेश हनुमानभगत सारडा यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.संजय घनश्याम बजाज

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.प्रशांत विजयकुमार मजलेकर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १८९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय एन.सी.सी.राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेमध्ये मिरजेच्या ज्युबिली कन्या प्रशाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थीनी कु.संस्कृती रामलिंग तोडकर हिने महाराष्ट्र राज्याच्या संघातून प्रतिनिधित्व करीत नेमबाजीत सुवर्ण तसेच खो-खो स्पर्धेत रौप्य पदकाची कमाई केली. सुवर्ण व रौप्य पदकांची कमाई करुन मिरज शहराच्या नावलौकीकात भर घातली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा कु.संस्कृती रामलिंग तोडकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा. किशोर दादासो जमादार

अनुमोदक :- मा.संजय नायकू मेंढे

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कुंकळेळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकार मंत्रालय नवी दिल्ली यांच्याकडून वृद्ध सेवाश्रम कुपवाड या संस्थेस राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला. तो भारताचे महानहिम राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांचे शुभहस्ते संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा.शरद पाटील यांनी स्विकारला त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मा.प्रा.शरद पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

सौ.कांचन कांबळे
महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९२

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१०/१०/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये अस्तित्वात आली. महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ मधील तरतुदी लागू करुन घेवून, अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रथमपासून कलम २९-अ अन्वये प्रभाग समित्यांचे गठण करण्यात येवून त्यानुसार कामकाज चालविले जात आहे. तद्नंतर महानगरपालिकेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रभाग समित्यांचे गठण करण्यात आलेले आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची चौथी सार्वत्रिक निवडणूक २०१३ नुकतीच पार पडली असून, निवडणूक कामकाजासाठी सौकार्याच्या दृष्टीने निवडणूक निर्णय अधिकारी निहाय प्रभाग रचनेस मान्यता निश्चित करणेत येवून, एकूण ३८ प्रभागातून ७८ नगरसदस्य निर्वाचित झालेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा कलम २९-अ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका ठरविल अशा लागू असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करणेत येईल. तसेच, ३ लाखापेक्षा अधिक व ४.५० लाखांपर्यत लोकसंख्येसाठी - किमान तीन व कमाल चार आणि ४.५ लाखापेक्षा अधिक व १२ लाखांपर्यत लोकसंख्येसाठी - किमान चार व कमाल नऊ अशी तरतुद आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सन २०११ चे जनगणनेनुसार ५,०२,६९७ इतकी लोकसंख्या असलेने, त्यानुसार अधिनियमातील तरतुद विचारात घेवून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी प्रभाग समित्यांचे गठण करताना प्रभागाची भौगोलिक स्थिती व संलग्नता विचारात घेवून महानगरपालिका क्षेत्रासाठी खालील प्रमाणे चार प्रभाग समित्यांचे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती क्रमांक	प्रभाग क्रमांक
१.	प्रभाग समिती क्रमांक - एक	१अ, १ब,२अ,२ब,३अ,३ब,१६अ,१६ब,१७अ,१७ब,१८अ, १८ब,१९अ,१९ब, १९क,२२अ,२२ब
२.	प्रभाग समिती क्रमांक - दोन	२०अ,२०ब,२१अ,२१ब,२३अ,२३ब,२४अ,२४ब,३२अ, ३२ब,३३अ,३३ब,३४अ,३४ब,३५अ,३५ब,३६अ,३६ब, ३७अ,३७ब, ३८अ,३८ब
३.	प्रभाग समिती क्रमांक - तीन	४अ,४ब,५अ,५ब,६अ,६ब,७अ,७ब,८अ,८ब,८क,१४अ, १४ब,१५अ,१५ब,२५अ,२५ब
४.	प्रभाग समिती क्रमांक - चार	९अ,९ब,१०अ,१०ब,११अ,११ब,१२अ,१२ब,१३अ,१३ब,२६ अ,२६ब,२७अ,२७ब,२८अ,२८ब,२९अ,२९ब,३०अ,३०ब, ३१अ,३१ ब

प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१,२,३,४

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९३

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.१०/१०/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासनाने महिलांना केंद्रस्थानी महापालिका क्षेत्रातील महिलांचा सहभाग त्यांना संरक्षण, महिलांची आर्थिक उन्नत्ती आणि त्यांच्या क्षमतेचे संवर्धन तसेच त्यांना अनुकूल वातावरण निर्मिती यासाठी नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रातील महिलांना सक्षम करणेसाठी महिला व बालकल्याण समिती स्थापन करणेबाबत निर्देश आहेत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक - २०१३ नुकतीच पार पडलेली आहे. सदर निवडणुकीमध्ये ४० महिला सदस्य निर्वाचित झालेल्या आहेत. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निर्वाचित झालेल्या महिला सदस्या मधून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० महानगरपालिकेच्या विशेष समित्या मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक आहे. "महिला व बालकल्याण समिती वरील सदस्या पैकी किमान ७५% सदस्य हे महिला पालिका सदस्यापैकी असतील अशी तरतुद आहे." त्यानुसार महिला व बालकल्याण समितीसाठी एकूण निर्वाचित ४० महिला सदस्यांमधून सदस्य संख्या १६ इतकी निश्चित करुन, अधिनियमातील कलम ३१-अ मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समितीचे खालील प्रमाणे गठण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१.	हुलवान मालन चंद्रकांत	९.	चव्हाण शालन मारुती
२.	कलगुटगी धोंडूबाई राजाराम	१०.	खोत सुलोचना धनपाल
३.	पेंढारी गुलजार आल्लाबक्ष	११.	बागवान जरीना जमील
४.	पाटील रोहिणी सत्यजीत	१२.	मदभावीकर प्रार्थना प्रसाद
५.	पाटील मृणाल चेतन	१३.	कुंडले अंजना रघुनाथ
६.	पाटील पुष्पलता बाबासाहेब	१४.	बंडगर प्रियांका सुरेश
७.	खोत सुनिता शिवाजी	१५.	कोरे वैशाली पांडूरंग
८.	भोसले शकुंतला दत्तात्रय	१६.	खोत संगिता विठ्ठलराव

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (सार्वजनिक उद्याने) यांचे दि.०२/०९/२०१३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील महापालिका मालकीच्या रस्त्याकडेची खुल्या जागेतील,सार्वजनिक उद्याने व इतर कार्यालयाच्या परिसरातील धोकादायक,वठलेली,वादळी पाऊस वाऱ्याने उन्मळून पडलेली तसेच विद्युत तारांना धोकादायक असणारी झाडे व झाडांच्या फांद्या सक्षम अखत्यारीच्या मान्यतेने खात्यामार्फत तोडली जातात. अशी तोडलेली लाकडे आमराई उद्यानामध्ये एकत्रीत करुन त्यांचा वेळोवेळी जाहीर लिलाव केला जातो. धोकादायक झाडे व फांद्या यांचा जागेवर जाहीर लिलाव करणेसाठी वार्षिक एजन्सी नियुक्त केलेस महापालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे.

सद्या बाजारभावाप्रमाणे जळावू लाकडाचा प्रति टन दर रु.२०००/- इतका असून, त्यामधून तोडणी खर्च प्रति टन रु.७००/- वाहतूक खर्च प्रतिटन रु.३००/- वजा जाता प्रतिटन अंदाजे र.रु.१०००/- मात्र रक्कम शिल्लक राहणार आहे. त्यानुसार प्रतिटन रुपये १०००/- मात्र किमान देकार रक्कम गृहित धरुन धोकादायक झाडे व फाद्यांचा जागेवर जाहीर लिलाव करणे योग्य होणार आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित आहे.

महापालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे, झाडांच्या धोकादायक फांद्या,वठलेली झाडे,वादळी पाऊस वाऱ्याने उन्मळून पडलेली झाडे व फांद्या इत्यादी जळाऊ लाकडांचा जागेवर जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी तोडणी खर्च,वाहतूक खर्च वजा जाता प्रतिटन र.रु.१०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन तसेच, विषयपत्रातील १ ते १० शर्ती-अटीस अधिन राहून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक एजन्सी नियुक्त करणेसाठी जाहीर लिलाव नोटीस प्रसिद्ध करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

बागांचा अधिक्षक

ठराव सर्वानुमते मंजुर

आयुक्त उपायुक्त
महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.किशोर दादासो जामदार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रात सार्वजनिक मंडळे व संस्था यांच्या वतीने लोक वर्गणीतून गणपती उत्सव,नवरात्र उत्सव मोहरम इत्यादी उत्सव सार्वजनिक स्वरुपात साजरे केले जातात. या उत्सवांच्या माध्यमातून संस्कृती जोपासणे, लोक जागृती, पर्यावरण जागृती व शासनाचे धोरणाबाबत माहिती दिली जाते व अनेक समाजोपयोगी कार्य करीत असतात असे कार्यक्रम महापालिकेच्या रस्त्यांवर स्टेज व मंडप घालून साजरे केले जातात. यासाठी महापालिकेकडून रस्त्यावर स्टेज मंडप घालण्यासाठी शुल्क आकारले जाते हे उपक्रम सार्वजनिक असल्याने व ते लोकवर्गणीतून होत असल्याने यासाठी शुल्क आकारणे अन्यायकारक वाटते अशा कार्यक्रमांसाठी सार्वजनिक मंडळे व संस्था यांना महापालिकेच्या क्षेत्रात स्टेज व मंडप घालण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्ण माफ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सन्मा सदस्य यांनी विदीत केल्यानुसार सद्या दिवाळी सण जवळ आल्याने, आवश्यक असणाऱ्या वस्तु एकाच ठिकाणी उपलब्ध होणे नागरिकांच्या दृष्टीने सोईचे होणार आहे. याकरीता दिवाळी सणानिमित्त मिरज लक्ष्मी मार्केट परिसरामध्ये मिरज फायर फायटर समोर किंवा पोस्ट ऑफिस कॉर्नर येथे फटाके स्टॉल लावणेत यावेत त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शोभना कांबळे

महापौर,

सहा.आयुक्त १,२,३,४
माहिती व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९६

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज शहरातील लोणी बाजारमधील आजपर्यत किती व्यावसायिकांचे हातगाडे जप्त केले. किती हातगाडेवाल्यांवर दंडात्मक कारवाई केली. अद्यापही तिथे हातगाडे लावून व्यवसाय करीत आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केली आहे. मा.शासनाचे फेरीवाले धोरण अंतर्गत प्रशासनाने आजअखेर तेथील व्यवसायिकांचे नियोजन केले नाही. सद्या तेथील व्यवसायिकांची उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचा उदरनिर्वाह त्यांच्या व्यवसायावरच अवलंबून आहे. बरेच दिवस झाले त्यांना पर्यायी व्यवस्था प्रशासनाने केलेली नाही. प्रशासनाने कोणते धोरण अवलंबिले आहे? याबाबत चर्चा होवून निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती मिरज शहरातील फेरीवाले व्यवसायीकांचे हातगाडे लावणेसाठी पर्यायी व्यवस्था तातडीने करणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे
महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरणलिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सौ.अनारकली जमीर कुरणे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आमराई उद्यानामध्ये येणाऱ्या नागरिकांच्या लहान मुलांना खेळण्यासाठी विविध प्रकारची खेळणी बसविणेत आलेली होती. परंतु सद्यस्थितीस सदर खेळण्यांची फार दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या लहान मुलांची गैरसोय होत आहे. तसेच उद्यानाचे सौंदर्य लोप पावत आहे. याकरीता सदरची खेळण्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

पद्मभूषण डॉ.वसंतदादा मार्केट यार्ड येथील विष्णूअण्णा सार्वजनिक उद्यान येथील लोखंडी गेट व खेळण्यांची मोडतोड झालेली आहे. त्यांचीही दुरुस्ती करणे गरजेचे आहे व सदर उद्यानामध्ये नवीन झाडांची लागवडही करणेत यावी. तसेच सदर उद्यानामध्ये पुन्हा मोडतोडीचे प्रकार घडू नयेत याकरिता उद्यानामध्ये एक सुरक्षारक्षक कम वॉचमन नेमण्यासाठी चर्चा होवून निर्णय घेणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. प्रस्तुत कामी सभागृहमध्ये सविस्तर चर्चा झालेनुसार वरील विषयांकीत कामी प्रशासनाने महासभेच्या मान्यतेसाठी उद्यान विकास करणे व सुरक्षा रक्षक नेमणेबाबतचा अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांना पाणी कनेक्शन देण्यासाठी यापूर्वी महासभेने गुंठेवारी नियमितीकरणाचा प्रस्ताव सादर करण्याच्या अटीवर रु.१०० मात्रच्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देण्याचे धोरण अवलंबले होते. परंतू गुंठेवारी नियमितीकरणाची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपल्याने गुंठेवारीमध्ये पाणी कनेक्शन देणे प्रशासनाने बंद केले होते.

गुंठेवारी भागातील नागरिकांचे कडून सदरची योजना पुर्ववत सुरु करणेची वारंवार मागणी होत आहे. तसेच, दि.१९/०५/२०१२ रोजीच्या महासभेमध्ये गुंठेवारी नियमितीकरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०१२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे गुंठेवारी भागातील नागरिकांना रु.१०० मात्रचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र घेऊन पाणी कनेक्शन देणेची योजना पूर्ववत सुरु करुन ३१ मार्च २०१४ पर्यंत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शेवंता वाघमारे

श्रीकांचन कवठेकर
महापौर,

कार्यकारी अभियंता (पा.पु.)
सांगली/मिरज

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- १९९

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

गोकूळनगर ते मार्केट यार्ड कडे जाणाऱ्या रस्त्यावर कोंची कोरवी समाजाच्या स्मशान भूमी समोरील महानगरपालिकेच्या मालकीच्या त्रिकोणी जागेवर साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व रयतचे राजे राजर्षी शाहू महाराज यांचे अर्धपुतळे बसविणेत यावेत व सदर परिसराला भिमांगण परिसर नाव देणेत यावे. शिवाय बगीचा तयार करणेत यावा त्यास ही सभा सहमती दर्शवित असून, तसा प्रस्ताव मा.शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणेस तःत्वताः मान्यता देणेत येत आहे. प्रस्तुत प्रस्तावाचे अनुषंगाने सदस्य सौ.शेवंताबाई गो.वाघमारे यांनी दिलेली सूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून, उपरोक्त ठिकाणी महात्मा जोतीबा फुले यांचाही अर्धपुतळा या ठिकाणी बसविणेत यावा असे ही सभा सर्वानुमते ठरवित असून, प्रस्तुत प्रस्तावाचे कामी सविस्तर अहवाल आगामी महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

अनुमोदक :- मा.ज.बा.होकर्डे

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचकाच्या अनुमोदनाने

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २००

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संजय नायकू मेंढे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या गुंठेवारी भागातील नागरिकांना आपली गुंठेवारी नियमितीकरणासाठी मुदत वाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढी प्रस्तावावर मा.आयुक्तसो यांनी स्वाक्षरी करणेसाठी गुंठेवारी नियमितीकरणासाठी खरेदीपत्र आवश्यक असलेचा शेरा लिहून मुदतवाढ ठरावावर स्वाक्षरी करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक गुंठेवारी भागातील नागरिकांची गैरसोय झाली आहे. या अटीमुळे अनेक नागरिकांनी आपले प्रस्ताव सादर केले नाहीत. तरी, सदर अट मा.महाराष्ट्र शासन यांचे आदेशान्वये रद्द करुन गुंठेवारी नियमितीकरण प्रस्ताव दाखल करणेसाठी दि.३१ मार्च २०१४ पर्यत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विवेक कांबळे यांनी सूचित केल्यानुसार हार्डशिप प्रिमियमसाठी दि.३०/६/२०११ ही कट ऑफ डेट निश्चित केलेली होती. सद्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जकात कर रद्द करुन महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्थानिक संस्था कर लागू करणेत आला आहे. स्थानिक संस्थांकडून मिळणारे उत्पन्न विचारात घेता महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता, उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने हार्डशिप प्रिमियमसाठी अभय योजनेस दि.३१/३/२०१४ पर्यंत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.कि.दा.जामदार

अनुमोदक :- मा.रोवंता.वाघमारे

सहा. संचालक नगररचनाकार

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कोचन उ.कांबळे

महापौर,

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०१

विषय क्रमांक :- १ (ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दिवाणी न्यायालय जिल्हा न्यायालय,कामगार न्यायालय तसेच औद्योगिक न्यायालय व मुंबई हायकोर्ट तसेच, सुप्रिम कोर्टात विविध दावे चालू आहेत. याकामी यापूर्वी कोर्टामध्ये दावे चालविणेकरीता पॅनेल वरील वकीलांची नियुक्ती केली आहे. नविन वकील नियुक्त करणेसाठी महासभेच्या मान्यतेसाठी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. प्रस्तुत प्रस्तावाचे कामी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. महानगरपालिकेने वकील पॅनेलची नियुक्ती दोन वर्षासाठी सन २००८ मध्ये केली असून, वकील पॅनेलला मुदतवाढही देणेत आलेली नाही. तरी नविन वकील पॅनेल नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव अलहिदा सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कांबळे

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.पै.गौतम संभाजी पवार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सद्याच्या आर्थिक स्थितीबाबत चर्चा करणे, आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने नवनवीन उत्पन्नाचे स्त्रोतांबाबत चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे, महापालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुर्नवसनाचे रखडलेल्या कामाबाबत चर्चा करुन सदरची पुर्नवसन योजना लवकरात कशी पूर्ण होईल याबाबत चर्चा करुन धोरणात्मक निर्णयासाठी आलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली.

महाराष्ट्र शासनाने महानगरपालिका क्षेत्रातील जकात कर रद्द करुन स्थानिक संस्था कर आकारणी करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्थानिक संस्था कर आकारणी सुरु आहे. सदर करापासून मिळणारे उत्पन्न आणि महानगरपालिकेचा होणारा खर्च याचा लेखाजोखा विचारात घेतला असता, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जादा खर्च होत असलेचे निर्देशनास आणले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असणारे अधिकारी यांचे मर्यादेपुरतीच नियुक्ती करणेत यावी. महाराष्ट्र शासनाने अनेक अधिकारी महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर पाठविले आहेत. त्यांचे वेतनापोटी होणारा खर्च जर विचारात घेतला तर, महानगरपालिकेस तो परवडणारा नाही. त्यामुळे प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी यांना शासन सेवेत पाठविणेत यावेत. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना १२/२४ अश्वासित पदोन्नतीचा लाभ दिलेला असून, त्यांना त्यानुसार वेतन आदा केले जाते. अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नती देवून नियुक्ती करणेत यावी. त्यामुळे महापालिकेची आर्थिक बचत होणार आहे. भविष्यात महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना वेतन देणेस महापालिकेस कसरत करावी लागणार आहे. वरील सर्व बाबी विचारात घेवून महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत व उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणेच्या दृष्टीने बैठकीचे आयोजन करणे उचित वाटते. त्यानुसार प्रस्तुत प्रस्तावाचे कामी प्रशासनाने बैठकीचे आयोजन करणेची कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

मुख्यलेखापाल
प्रशासन अधि.
(आस्थापना)

सूचक :-
महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/१०/२०१३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील शासन निर्ण क्र.राफेधो-०३०९/प्र.क्र.२०/नवि-३४ दि.०२ मार्च २००९ नुसार मा.आयुक्तसाो यांचे मान्यतेने सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेसाठी वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची नियुक्ती करणेत आली आहे. त्यास मा.महासभा ठराव क्र.३८ दि.१९/०६/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयातील निदेशानुसार मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली शहर फेरीवाला समिती तसेच, सभापती, प्रभाग समिती यांचे अध्यक्षतेखाली प्रभाग फेरीवाला समिती गठीत करणेत आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) उपविधी २०१३ तयार करणेत आली असून, उपविधी मधील अ.क्र.१५ महसुल गोळा करणे (अ) नोंदणी शुल्क (फी) रक्कम व (ब) मासिक परिक्षण आकार रक्कम आकारणी करणे मा.महासभेच्या मान्यतेने निश्चित करावयाची तरतुद असून, सदरचा उपविधी स्थानिक दैनिक वृत्तपत्रात जाहिर प्रसिद्ध करुन एक महिन्याच्या कालावधीपर्यत नागरिकांच्याकडून सूचना व हरकती मागविणेबाबत शासन परिपत्रकात मध्ये नमुद आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला व्यवसायांचे (विनियमन) उपविधी २०१३ चे मसुद्यास तसेच, उपविधीमधील अ.क्र.१५ महसुल गोळा करणे (अ) नोंदणी शुल्क (फी) रुपये १०००/- मात्र व (ब) मासिक परिक्षण आकार रुपये २५०/- मात्र याप्रमाणे दर निश्चित करणेस मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५९ अन्वये विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास ही सभा मान्यता देत असून, कलम ४६० अन्वये सदरचे उपविधी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर प्रसिद्ध करुन एक महिन्याच्या कालावधीपर्यत नागरिकांच्याकडून सूचना व हरकती मागविणेस येणारे प्रसिद्धीचे व अनुषंगिक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

मालमत्ता व्यवस्थापक

सूचक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

सौ. कोचन उ. कोकाटे
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०४

विषय क्रमांक :- ऐनवेळ

सोबतचे उपायुक्त (मिरज विभाग) यांचे दि.१८/१०/२०१३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात शहराचे जाहिरात फलकांच्या माध्यमातून होणारे विद्रुपीकरण रोखण्यासाठी तसेच जाहिरात प्रदर्शनाबाबतचे विविध कायदे, नियमावली मा.न्यायालयाचे नियमबाह्य जाहिरात प्रदर्शन रोखण्याबाबतचे विविध निर्देश यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचा महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात प्रदर्शनाबाबत उपविधी असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३, महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ यातील जाहिरात प्रदर्शनाविषयक तरतुदी विचारात घेवून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रशासनाने जाहिरात व फलक नियंत्रण नियमावली (उपविधी) २०१३ तयार केली असून, उपविधीचा मसुदा महासभेपुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर केलेला आहे.

सदरचा उपविधी मसुदा या सभेने अवलोकनी घेतला असून, कलम ४६० अन्वये पुढील योग्यती कार्यवाही प्रशासनाने ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

सूचकांच्या अनुमोदकांच्या
महापौर,

मा.उपायुक्त (मिरज)
मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०५

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.दिग्विजय प्रदीप सुर्यवंशी आणि मा.जगन्नाथ बापू ठोकळे सदस्य यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली, कोल्हापूर,सोलापूर सातारा रत्नागिरी,सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे या मागणीसाठी सदर जिल्ह्यातील वकीलांनी तीव्र स्वरुपाचे आंदोलन सुरु केले आहे. या खंडपीठामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका तसेच सांगली जिल्ह्यातील अनेक न्यायालयीन प्रकरणांसाठी व अनेक नागरिकांसाठी सदरचे खंडपीठ एक महत्वाचा दुवा ठरणार आहे. या खंडपीठामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनेक नागरिकांचे न्यायालयीन प्रश्न सुटण्यास मदतच होणार आहे. तरी सदरचे खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे या मागणीला समस्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांच्या वतीने सदर आंदोलनास पाठींबा देणे उचित होणार असे या सभेचे स्पष्ट मत आहे. सांगली, कोल्हापूर,सोलापूर सातारा रत्नागिरी,सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे त्यास ही सभा जाहीर पाठींबा देत आहे.

सदर ठरावाची नोंद घेवून प्रशासनाकडून उचित कार्यवाही ठेवणे यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचकांच्या सूचनेनुसार

अनुमोदक :-

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- १९/१०/२०१३

ठराव क्रमांक :- २०६

विषय क्रमांक :- ऐनवेळ

सोबतची मा.जगन्नाथ बापू ठोकळे सदस्य यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा समाजाला शैक्षणिक क्षेत्रामध्ये आणि नोकरीमध्ये आरक्षण मिळावे यासाठी मराठा समाजाच्या वतीने आंदोलने सुरु आहेत. मराठा समाज हा आरक्षणापासून वंचित आहे. मराठा समाजाला सदर क्षेत्रामध्ये आरक्षण देणेत यावे या मागणीसाठी मा.ना.नारायण राणे यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करणेत आलेली आहे. सदर समितीच्या वतीने मराठा समाजाला आरक्षण देणेविषयी आपली मते विदीत करुन ठिकठिकाणी जाऊन निवेदने स्विकारत आहेत. वास्तविक मराठा समाजामध्ये अनेक गोरगरीब असून, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची गरज आहे यासाठी महाराष्ट्र राज्यातील मराठा समाजाला शैक्षणिक क्षेत्रामध्ये आणि नोकरीमध्ये आरक्षण देणेत यावे त्यास ही सभा जाहीर पाठींबा देत आहे.

सदर ठरावाची नोंद घेवून प्रशासनाकडून उचित कार्यवाही ठेवणे यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सौ.कांचन कदम

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका